वर्ष- ११ | अंक- ७ | मुंबई, मंगळवार, ३१ डिसेंबर २०२४ ते ०६ जानेवारी २०२५ | पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 आहारातील कडधान्य आरोग्यासाठी उत्तम
3 → दिल है छोटासा, छोटीसी आशा
३ महिन्यांत ५७५ कोटीच्या मालमत्ता कर वसुलीचे आव्हान ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र अभियान कार्यशाळा इगतपुरी येथे संपन्न








**इगतपुरी -** दिनांक - २८.१२.२०२४ रोजी थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र अभियान अंतर्गत नुकतीच इगतपुरी येथे क्लिनिकल लॅबोरेटरी ओनर्स वेल्फेअर असोसिएशन आणि आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट यांच्या वतीने एक महत्वपूर्ण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला राज्यभरातील अनेक लॅबोरेटरी मालकांनी हजेरी लावली.

कार्यशाळेचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातून थॅलेसिमिया मुक्त करण्यासाठी उपाययोजना व सरकारच्या धोरणांवर चर्चा करणे हा होता. आश्रय ट्रस्टचे संस्थापक श्री. दीपक मोरेश्वर नाईक यांच्या संकल्पनेतून व आरोग्य विभागाचे सचिव प्रोफेसर प्रकाश पांगम यांच्या मार्गदर्शनाखाली, विविध व्याख्यानांद्वारे उपस्थितांना रक्तातील सिबिसीच्या बारकाव्याच्या माध्यमातून अनेमिया थॅलेसिमिया व ब्लड कॅन्सर व इतर रोगाचे निदान होते. तसेच थॅलेसिमियावर जागरूकता आणि त्याच्या प्रतिबंधासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शिवकुमार आर सानप क्लोवा एज्युकेशन चे अध्यक्ष श्री. शिवकुमार आर सानप, तसेच विदर्भ मेडीकल लॅब टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन सेक्रेटरी श्री. रवी गजानन येवले , आणि बर्वे क्लिनिकल लॅबोरेटरी ,नाशिक श्री. जयंत बर्वे सर उपस्थित होते .

यामध्ये थॅलेसिमियाच्या प्रसाराचे कारण, निदान प्रक्रिया, उपचारपद्धती, प्रतिबंधात्मक उपाय आणि समाजामध्ये याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध धोरणांवर सखोल चर्चा झाली. या कार्यशाळेने राज्यातील आरोग्यसेवा व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

कार्यशाळेचे ठळक मुद्दे:

1. थॅलेसिमियाचे प्रादुर्भाव थांबवण्यासाठी प्री-मॅरिटल टेस्टिंग आणि जनजागृती मोहीम राबविण्याची गरज.
2. सरकारने थॅलेसिमियाच्या चाचण्या मोफत उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे.
3. समाजातील प्रत्येक घटकाने या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवणे.

या उपक्रमामुळे महाराष्ट्राला थॅलेसिमिया मुक्त करण्यासाठी सकारात्मक पाऊल उचलले गेले आहे.




# प्रवाशांची आर्थिक कोंडी, खासगी वाहतूकदारांकडून बसभाड्यात वाढ



**मुंबई :** सरत्या वषार्चा निरोप आणि नववषार्चे स्वागत करण्यासाठी मुंबईकरांनी कोकण, गोव्याची वाट धरली. त्यामुळे मुंबईहून कोकण, गोव्याला जाणाऱ्या खासगी प्रवासी वाहतुकीचे बसभाडे गगनाला भिडले आहेत. मुंबई ते गोवा वातानुकूलित शयनयान बसचे भाडे सुमारे ५ हजारांपर्यंत वाढले. बसभाड्याचे दर वाढले असले तरीही प्रवाशांकडून प्रवास केला जात आहे, परंतु दुसरीकडे सर्वसामान्य प्रवाशांची प्रवास करताना आर्थिक कोंडी झाली आहे. गोवा आणि कोकण किनारपट्टी येथे नववर्ष साजरा करण्याचा अनेकांचा बेत असतो. त्यामुळे रेल्वे, विमानाची तिकिटे काढली जातात, परंतु रेल्वेची तिकीट आरक्षित न झाल्याने, प्रवास करण्यास अडचण येते. तसेच मुंबई ते गोवा दरम्यानचे विमानांच्या तिकिटांचे भाडे ५ हजारांपासून ते ३२ हजारांपर्यंत वाढले आहे. त्यामुळे विमान प्रवास करणे खर्चीक बाब असल्याने प्रवाशांनी खासगी बस गाडीला पसंती दर्शवली आहे. त्यातही वातानुकूलित शयनयान बसची निवड प्रवासी करत आहेत. वषार्खेरीस गोव्याला जायला सर्वाधिक मागणी असते. या काळात मुंबई ते गोवा एकेरी वाहतूक होते. गोव्यातून परतणाऱ्या बहुतांश बस जवळपास रिकाम्या जातात. बरेच पर्यटक नवीन वर्ष साजरे करण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे सध्या वाढीव दर आहेत. गोव्यानंतर महाबळेश्वर, लोणावळा-खंडाळा, कोकणातील किनारपट्टी, दमण, सिल्वासा या ठिकाणांवर पर्यटक जातात, असे एका खासगी वाहतूकदाराने सांगितले.

**खासगी बस भाड्यात वाढ अशी...**

- मुंबई ते गोवा जाणाऱ्या वंदे भारत, जनशताब्दी, कोकण कन्या, तेजस यांसारख्या लोकप्रिय रेल्वेगाड्याचे आरक्षण पूर्ण झाले आहे. त्यामुळे प्रवासी खासगी बसकडे वळतात. खासगी वाहतूकदारांकडून तिकीटदरात वाढ केली आहे.
- मुंबई ते गोवा इतरवेळी ८०० ते १००० रुपये तिकीट असलेल्या बसचे दर २ हजारांपासून ते ५ हजारांपर्यंत वाढले आहे.
- मुंबई ते वैभववाडी ९०० ते १००० रुपये, मुंबई ते गुहागर ६०० ते १,५०० रुपये, मुंबई ते चिपळूण ९०० ते ५००० रुपये, मुंबई ते सावंतवाडी ९०० ते ३,५०० रुपये, मुंबई ते महाबळेश्वर ५०० ते ३,७०० रुपये, मुंबई ते लोणावळा ५५० ते ३ हजार रुपये असे दर खासगी बसचे आहेत.

# आदिवासी बालिकेवर विनयभंग, ५४ वर्षीय इसमावर पॉक्सो

**पालघर :** पालघर शहरात एका आठ वर्षीय बालिकेवर लगतच्या ५४ वर्षीय किराणामाल दुकानदाराने विनयभंग केल्याचे प्रकार उघडकीस आले असून संबंधित व्यक्तीविरुद्ध बालकांचा लैंगिक अत्याचाराविरुद्ध कायदा (पॉक्सो) अंतर्गत पालघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुकानदार आपल्या पत्नीला व मुलांना गावी पाठवल्यानंतर किराणा माल घेण्यासाठी येणाऱ्या या बालिकेला गृह उपयोगी वस्तू विकत घेऊन जाण्यासाठी दुकानाच्या मधल्या बाजूला बोलवत असे. तसेच शरीराच्या लैंगिक भागांवर स्पर्श करण्याचा प्रयत्न त्यानी काही दिवसांपासून केला होता. या मुलीने याबाबतची माहिती आपल्या आईला सांगितल्या नंतर परिसरातील लोकांनी या व्यक्तीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. विशेष म्हणजे या दुकानदाराने यापूर्वी देखील असेच काही प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे.या संदर्भात पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ही घटना घडल्या बाबत दुजोरा दिला. या बालिकेच्या लैंगिक अत्याचार विरोधी पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करत असल्याची माहिती त्यांनी दिली. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

# नवीन वर्षाच्या स्वागतावेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त, सुरक्षेसाठी 12 हजार पोलीस तैनात, गृहराज्यमंत्री योगेश कदमांची माहिती





**मुंबई,** नवीन वर्षाच्या स्वागतवेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त राहणार आहे. 8 अप्पर पोलिस आयुक्त, 29 पोलिस उपायुक्त, 53 सहाय्यक पोलिस आयुक्त, 2184 पोलिस अधिकारी आणि 12 हजार 48 पोलिस अंमलदार गस्तीवर असणार आहेत, अशी माहिती राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली. शहरातील महत्वांच्या चौकात नाकाबंदी ठेवली जाणार असल्याचे कदम म्हणाले.

मुंबई पोलीस सक्षम आहेत. जगातील सुरक्षित शहर म्हणून मुंबईची ओळख आहे. ती प्रतिमा पोलिस कायम ठेवतील हा विश्वास असल्याचे योगेश कदम म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी पोलिस प्रशासनला सुरक्षेबाबत सूचना दिलेल्या आहेत. नव वर्षाच्या सुरक्षेसाठी 12 हजार अंमलादार असतील तर महिला पोलिसही आहेत असे कदम म्हणाले. नव वर्षाच्या स्वागतासाठी मुंबईकरांनी कोणतेही दडपण बाळगू नये. पोलीस आपल्या सुरक्षेसाठी तयार असल्याचे कदम म्हणाले. ड्रग्जबाबतचा विळखा एका दिवसात संपणार नाही असे कदम म्हणाले. ड्रग्जचं सेवन खासगी पार्टीत मोठ्या प्रमाणात होतं आहे, त्यावर विशेष लक्ष ठेवले जाणार असल्याचे कदम म्हणाले.

**ड्रग्ज पार्टींवर कडक कारवाई होणार**


ड्रग्ज पार्टींवर कडक कारवाई होणार आहे. 1 ग्रॅम असो की त्याहून अधिक कारवाई होणारचं असे कदम म्हणाले. विकणारा आणि विकत घेणारा या दोघांवरही कारवाई होणार असल्याचे कदम म्हणाले. मद्यपान करुन गाडी चालवणाऱ्यांविरोधात विशेष मोहिम सुरू राहणार आहे. 800 गाडया जप्त केल्या आहेत, काही महिन्यात सर्वच जबाबदारी पोलिसांवर टाकून चालणार नाही. नागरिकांनही जबाबदारीने वागलं पाहिजे, असे रेव्ह पार्टी किंवा इतर गुप्त पार्टींवर एटीसी व अंमली पदार्थ विभागाचे पोलिस लक्ष ठेवून राहतील

**वाहतूक विभागाकडून ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह ची विशेष मोहिम राबवली जाणार**

माझ्याकडे गृह विभागाचं महत्वाचं खातं आहे नवीन वर्षात ड्रग्ज तस्करांवर कडक कारवाई करुन तरुणाईला या विळख्यातून बाजूला करण्याचा माझा निश्चय राहील असेही कदम म्हणाले.

सावर्जनिक ठिकाणी गोंधळ घालणे, महिलांशी गैरवर्तवणूक, अनधिकृत मद्य विक्री, अंमली पदार्थ विक्री/सेवन यांवर कडक करवाई केली जाणार असल्याचे कदम म्हणाले.

# घाटकोपर जाहिरात फलक दुर्घटना : सात महिन्यांनंतर व्यावसायिक अरशद खानला अटक



**मुंबई:** घाटकोपरमधील पेट्रोल पंपावर महाकाय फलक कोसळून १७ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी गुन्हे शाखेने व्यावसायिक अरशद खानला अटक केली. आरोपीला लखनऊ येथून अटक करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. फलक प्रकरणातील आर्थिक व्यवहारांबाबतची माहिती उघड होण्याच्या दृष्टीने खानची अटक महत्त्वपूर्ण मानली जाते.

याप्रकरणात इगो मीडिया कंपनीचा संचालक भावेश भिंडे, इगो मीडिया कंपनीची माजी संचालक जान्हवी मराठे, जाहिरात फलकाच्या देखरेखीची जबाबदारी असलेला सागर पाटील व मान्यताप्राप्त स्थापत्य अभियंता मनोज संघू यांना अटक केली होती. त्या चौघांविरोधात ऑक्टोबर आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तपासात २०२१ व २०२२ मध्ये ईगो मीडियाने ३९ विविध व्यवहारांमध्ये १० बँक खात्यांमध्ये ४६ लाख ५० हजार पाठवण्यात आले होते. ती रक्कम अरशद खानला मिळाल्याचा आरोप आहे. त्याप्रकरणी गुन्हे शाखेने अरशद खानला समन्स बजावले होते. पण त्याने याप्रकरणी न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर तो बेपत्ता झाला होता. गुन्हे शाखा त्याचा शोध घेत होती.

अखेर खानला उत्तर प्रदेशातील लखनऊ येथून अटक करण्यात आली. आरोपी भागिदार असलेल्या कंपन्यांबाबतची माहिती गुन्हे शाखेला मिळाली असून त्या दृष्टीनेही तपास सुरू आहे. याप्रकरणी भादंवि कलम ३०४ (सदोष मनुष्यवध), ३३८ (गंभीर दुखापत), ३३७ (निष्काळजी कृत्यामुळे दुखापत करणे) व ३४ (सामान्य हेतू) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. आता त्याचा तपास गुन्हे शाखेचे विशेष तपास पथक करीत आहे. त्यांनी याप्रकरणी आतापर्यंत १०२ जणांचे जबाब नोंदवले आहेत. त्यात दोन महापालिका कर्मचारी, लोहमार्ग पोलीस दलाचे आजी व माजी अधिकारी, कर्मचारी असे मिळून सहा जण, कच्चामाल पुरवणाऱ्या ५ व्यक्तींच्या जबाबाचा समावेश आहे.

याशिवाय या दुर्घटनेत जखमी झालेल्या व्यक्ती व त्यांचे नातेवाईक अशा ९० जणांचे जबाबही नोंदवण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. या ३२९९ पानांच्या आरोपपत्रामध्ये निलंबित अधिकारी कैसर खालिद यांच्यासह भारतीय पोलीस सेवेतील (भापोसे) दोन अधिकाऱ्यांच्या जबाबाचाही समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यापूर्वी दादर येथील जाहिरात फलकाच्या परवानगीशी संबंधित असल्यामुळे आपण घाटकोपर जाहिरात फलकाला परवानगी दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पोलीस कल्याणाच्या दृष्टीने सर्व केल्याचे म्हटल्याचे सूत्रांनी सांगितले.

# दागिने खरेदी करायला आले आणि २ कोटींचे दागिने पळवले; महालक्ष्मी सराफाच्या दुकानात लूट

**मुंबई :** महालक्ष्मीच्या सातरस्ता परिसरातील रिषभ ज्वेलर्समध्ये दिवसाढवळ्या दागिने खरेदीच्या निमित्ताने आलेले ग्राहकांनी शस्त्राच्या धाक दाखवून दोन कोटी रुपयांचे दागिने लुटल्या प्रकार घडला. आरोपींनी मालकासह कामगारांना मारहाण करून बांधून पलायन केले. याप्रकरणी आग्रीपाडा पोलिसांनी दोन व्यक्तीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. चिंचपोकळी परिसरात राहणारे व्यावसायिक भवरलाल धरमचंद जैन (५०) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

महालक्ष्मीजवळील सातरस्ता येथील साने गुरुजी मार्गावरील लक्ष्मीदास वाडीत रिषभ ज्वेलर्सचे दुकान आहे. यामध्ये २ हजार ४५८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे १ कोटी ९१ लाख ६० हजार किंमतीच्या दागिन्यांसह १ लाख ७६ हजार किंमतीचे २२०० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने आणि १५ हजार रुपयांची रोख व एक वायफाय राउटर आरोपींनी पळवला आहे. तक्रारीनुसार, दोन अनोळखी व्यक्ती रविवारी दुपारी ३.३० च्या सुमारास दुकानात दागिने घेण्याच्या बहाण्याने आले.

काही कळण्यापूर्वीच त्यांनी जैन आणि दुकानातील कामगार पुरण कुमारला बंदुक, चाकूचा धाक दाखवला. त्यानंतर दोरीच्या साहाय्याने त्यांना बांधून ठेवले. तसेच ठार मारण्याची धमकी देऊन दुकानातील सुमारे दोन कोटी रुपये किंमतीचा मुद्देमाल लुटला. याबाबतची माहिती मिळताच आग्रीपाडा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला. सीसी टीव्हीद्वारे महत्त्वाची माहिती पोलिसांच्या हाती लागली आहे. याप्रकरणी गुन्हे शाखाही समांतर तपास करीत आहे.

# आंघोळ करताना या गोष्टींचा वापर कराल तर त्वचेच्या विकारांपासून होईल सुटका

ऑफिसला जाण्याच्या गडबडीत सगळ्यांनाच साग्रसंगीत आंघोळ करायला मिळतेच असे नाही.त्यामुळेच कावळ्याची आंघोळ करुनच कित्येकांना घराबाहेर पडावे लागते. या सगळ्या घाईमुळे शरीर स्वच्छ होतेच असे नाही. अशा वेळी शरीर स्वच्छ करण्यासाठी जर तुम्ही तुमच्या आंघोळीच्या पाण्यात काही गोष्टी घातल्या आणि आंघोळ केली तर तुम्हाला त्वचेसंदभार्तील कोणतेही विकार होणार नाहीत. या अशा गोष्टी आहेत ज्या घरात अगदी सहज उपलब्ध असतात. त्यांचा वापर करुन तुम्हाला फ्रेश तर वाटेलच शिवाय तुम्हाला तुमची त्वचा चमकदार, कोमल आणि स्वच्छ वाटेल.

**लिंबू**

व्हिटॅमिन सी ने युक्त असलेल्या लिंबाचे भरपूर फायदे आहे. अगदी चेहऱ्यापासून ते पचनापर्यंतच्या अनेक समस्यांसाठी लिंबाचे सेवन केले जाते. तुमच्या त्वचेसाठीही लिंबू चांगला आहे. लिंबामध्ये असलेले ब्लिचींग एजंट तुमच्या त्वचेवरील घाण, अतिरिक्त मळ काढून टाकते. शिवाय तुमचे टॅनिंगही कमी करते. जर तुम्ही रोजच कोमट पाण्याने आंघोळ करत असाल तर तुम्ही तुमच्या पाण्यामध्ये अर्ध लिंबू पिळायला काहीच हरकत नाही. लिंबाच्या रसामुळे तुमच्या शरीरावरील मळ, चिकटपणा निघून जातो. तुम्हाला फ्रेशसुद्धा वाटते. या शिवाय त्वचेसंदर्भातील अन्य त्रासही दूर होतात जर तुम्हाला सकाळी वेळ नसेल तर घरी आल्यानंतर झोपण्याआधी आंघोळ करताना त्यात लिंबू पिळा. सकाळीही अगदी काहीच सेंकदात तुम्ही लिंबू पिळून त्या पाण्याने आंघोळ करु शकता.

**खडे मीठ**

जर तुम्हाला दिवसभरात आलेला थकवा घालवायचा असेल. तर खडे मीठ तुमच्यासाठी अगदी परफेक्ट आहे. खडे मीठ घातलेल्या पाण्यात आंघोळ केल्यामुळे तुम्हाला रिलॅक्स वाटते. ताणतणाव दूर होते. अंगदुखी बंद होते. या शिवाय मीठामुळे त्वचा मुलायम होते. त्यामुळे तुम्हाला ऑफिसमधून घरी आल्यानंतर अशाप्रकारे आंघोळ करायला काहीच हरकत नाही. गरम पाण्यात साधारण अर्धा ते १ चमचा मीठ घालून मीठ विरघळू द्या. या पाण्याने आंघोळ करा. शक्य असेल तर या पाण्यात काही वेळ बसलात तरी काहीच हरकत नाही. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी हा प्रयोग करुन पाहा.

**आलं**

जर तुम्हाला सर्दी, ताप असा काही त्रास असेल तर तुम्ही आवर्जून आल्याच्या पाण्यात आंघोळ करायला हवी. आलं थोडसं ठेचून तुम्हाला तुमच्या आंघोळीच्या पाण्यात घालायचे आहेत. तुम्हाला लगेचच आराम पडेल. जर तुमची त्वचा नाजूक असेल तर तुम्ही आलं वापरणं टाळा. कारण आल्यामुळे तुमची त्वचा जळू शकते. अगदी लहानला तुकडा ठेचून तुम्ही पाण्यात घालणे अपेक्षित असते.

**ग्रीन टी**

ग्रीन टी चे भरपूर फायदे आहेत हे आपण जाणतोच. पण आंघोळीच्या पाण्यात तुम्ही ग्रीन टीचे पाऊच उघडून घातले तर तुमच्या त्वचेला त्याचा अधिक फायदा होईल. त्वचा टोन्ड करण्यासाठी ग्रीन टी ही उत्तम आहे. तुम्हाला तुमच्या आंघोळीच्या पाण्यात ग्रीन टी घालायची आहे. तुम्ही ग्रीन टी चे मिळणारे सॅशे उघडून टाकले तर तुमच्या पाण्यात तुम्हाला पान दिसतील. त्यापेक्षा तुम्ही ग्रीन टीचे मिळणारे डीप डीप पाऊच पाण्यात घालून आंघोळ करा. साधारण आठवडाभरानंतर तुम्हाला फरक जाणवेल.

**अँटिसेप्टीक लिक्वीड**

खूप लोकांना पाण्यात अँटिसेप्टिक लिक्विड घालून आंघोळ करायची सवय असते. तुम्हालाही बाहेरील धूळ मातीचा त्रास असेल किंवा तुम्हाला झटपट स्वच्छता हवी असेल तर तुम्ही तुमच्या पाण्यात अँटीसेप्टीक लिक्वीड घालू शकता. यामुळे तुमच्या शरीरावर कोणत्याही जखमा असतील त ा र त्यांच्यावरही हे अँटीसेप्टीक लिक्वीड चांगले काम करते. पूर्वी अनेक अँटीसेप्टीक लिक्वीड लहान मुलांच्या आंघोळीच्या पाण्यात टाकण्याचा सल्ला दिला जायचा. पण आता डॉक्टर अगदी तान्ह्या बाळांना हा सल्ला देत नाही. आता तुम्ही कावळ्याची आंघोळ करत असाल तरी शरीर अस्वच्छ राहण्याचे टेन्शन नाही. तुम्ही या वस्तूंचा वापर करुन स्वच्छ शरीरच नाही तर अन्य विकारांपासून मुक्ती मि ळ वू शकता.



# गुडघेदुखी टाळण्यासाठी...

आयुष्यभर चालणे, धावणे, उडी मारणे आणि उभे राहणे हे शरीरातील सर्वांत मोठ्या सांध्यामुळे शक्य होते ते म्हणजे गुडघ्याचे सांधे. आपण हालचाल करतो करताना ते लक्षणीय भार सहन करतात आणि या सांध्यातील एक छोटीशी समस्याही मोठी गैरसोय बनते. अनेकदा सांध्यातील वेदना हे वृद्धत्वाच्या लक्षणांपैकी एक मानली जाते, मात्र वयानुसार गुडघ्याच्या समस्या टाळता येण्यासाठी व आधीच गुडघेदुखीचा सामना करत असल्यास वेदना व्यवस्थापित करण्यासाठी तुम्ही काही करू शकता का? याचे उत्तर हो आहे. गुडघ्याच्या सांध्यामध्ये तुमची हाडे, टेंडन्स, स्नायू आणि अस्थिबंध एकत्रितपणे जटिल यंत्र तयार करतात, त्यामुळेच तुम्हाला जटिल हालचाली करता येतात. खालच्या पायातील हाडे (टिबिया) आणि मांडी (फेमर), नीकॅप (पॅटेला) यांचा मिळून गुडघ्याचा सांधा तयार होतो. या हाडांची टोके कार्टिलेजने झाकलेली असतात, जे लवचिक असते आणि धक्के शोषून घेऊन, हाडांचे रक्षण करते. टेंडन्स आणि अस्थिबंध हाडे आणि स्नायूंना जोडलेले असतात आणि सांधे एकत्र आणि स्थिर ठेवतात आणि हालचाल करण्यास मदत करतात. अनेक वेगवेगळ्या उती एकत्र येऊन सांधे तयार होतात आणि आपण हालचाल करताना हे ऊतक एकत्र हलतात व त्यावेळी त्यांच्यामध्ये घर्षण होते. हे घर्षण रोखण्यासाठी गुडघ्याभोवती मऊ उती आणि द्रवाने (सायनोव्हियल) बनलेली एक कॅप्सूल असते.

**वेदना कशामुळे होतात?**

आता आपल्याला गुडघ्याच्या सांध्याची रचना माहीत असल्याने या संरचनेत काय बदल झाल्यावर वेदना होतात, ते पाहू या. गुडघेदुखीचे सर्वांत मोठी कारणे दुखापत, फ्रॅक्चर, लिगामेंट फाटणे, टेंडन्स फाटणे, पाय मुरगळणे, अचानक वळणे, सांध्यावर जास्त भार येणे, पडणे किंवा ऑस्टिओपोरोसिससारखी परिस्थिती ही आहेत. बैठी जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव यामुळे चालताना किंवा धावताना सांध्यांना आधार आसलेले स्नायू कमकुवत बनू शकतात. योग्य पोषणाचा अभाव, कमी प्रमाणात ओमेगा ३ (जे सूज कमी करते किंवा थांबवते आणि सांध्याचे आणखी नुकसान टाळते.), व्हिटॅमिन ए, सी, के हे हाडांचे आणि कर्टिलेज पेशींचे संरक्षण करण्यास मदत करतात. हे जीवनसत्त्वे अँटिऑक्सिडंट्स म्हणून देखील कार्य करतात आणि मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करून सूज कमी करतात. सैल शरीर, जखमी किंवा तुटलेल्या हाडांचे तुकडे गुडघ्याच्या सांध्यामध्ये अडकणे, गुडघ्याची कॅप निखळणे, पाय किंवा नितंब दुखणे तुमच्या चालण्यावर परिणाम करतात.

# आहारातील कडधान्य आरोग्यासाठी उत्तम



बऱ्याचदा आहारात कडधान्य ही वापरली जातात. परंतु, लहान मुले असो किंवा मोठी माणसे असो. अनेकदा कडधान्याचे सेवन करण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे कडधान्यामध्ये असलेली जीवनसत्व आणि पोषकतत्वे मिळत नाही आणि त्याचा परिणाम मानवाच्या स्वास्थावर होताना दिसतो. मात्र, ही कडधान्य का खावी? त्याच्यात असे कोणते गुणधर्म आहेत? ज्यामुळे तुमचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. चला तर जाणून घेऊया कडधान्याचे आरोग्यदायी फायदे

**हरभरे**

हरभरे आणि हरभऱ्याची डाळ मानवी आरोग्यासह सौंदर्यास देखील उत्तम आहे. यात काबोर्हायड्रेट, प्रोटीन, कॅल्शियम, लोहयुक्त खनिज आणि व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. रक्तदाब, खोकला आणि कावीळ या आजारावर लाभदायी असून हरभऱ्याच्या डाळीचे पीठ केस आणि त्वचेच्या सौंदर्यावर गुणकारी असते. यामुळे त्वचा उजळण्यास मदत होते.

**उडीद**

उडदाची डाळ शरीरास थंड असते. उडदाच्या डाळीत काबोर्हायड्रेट, व्हिटॅमिन्स, कॅल्शियम व प्रोटीन भरपूर प्रमाणात आढळतात. मुळव्याध, दमा, पक्षाघात आदी आजार असलेल्यांनी त्यांच्या आहारात उडीद डाळीचा जास्त वापर केला पाहिजे. या आरोग्यास फायदा होतो.

**मूग**

शिजवलेले किंवा भिजवलेल्या मुगामध्ये भरपूर प्रमाणात पोषकतत्त्वे असून ते मानवास आरोग्यवर्धिनी असतात. कोंब आलेल्या मुगामध्ये कॅल्शियम, लोहयुक्त खनिज, प्रोटीन, काबोर्हायड्रेट व व्हिटॅमिन्स यांच्या मात्रा दुपटीने वाढतात. ताप आणि खोकला झालेल्या व्यक्तीसाठी ते लाभदायी असतात.

**तूरडाळ**

तूरडाळीत खनिज, कार्बोहायड्रेट, लोहयुक्त खनिज, कॅल्शियम यांचे योग्य प्रमाण असते. तसेच तूर डाळ ही पचण्यास उत्तम असते. त्यामुळे लहान बालकांना तूरडाळीचे पाणी पिण्यास देतात. तसेच आजारी व्यक्तीस तुरीच्या डाळीची खिचडी खाण्यास देतात. मात्र, दमा आणि वाताचे आजार असणाऱ्या व्यक्तींना तूरडाळीपासून त्रास होतो.

**मसूर**

मसूरच्या डाळीचा उपयोग रक्तशुद्धी तसेच रक्तवाढीसाठी होतो. जुलाब, खोकला आणि अपचन यावर मसूरची डाळ लाभदायी असते. तसेच मसूरच्या डाळीचे पीठ चेहऱ्याला लावल्याने चेहरा उजळतो.



# रात्री गाढ झोप मिळत नाही?

काही जणांचा वेळ रात्री उशिरापर्यंत मोबाइलवर जात असल्यानं त्यांची झोप पूर्ण होत नाही. तर काहींना तणावामुळे झोप येत नाही. पुरेशा प्रमाणात झोप न मिळाल्यास कित्येक गंभीर आजारांना आयते निमंत्रण मिळते. आजारांची लागण होऊ नये, यासाठी योग्य प्रमाणात झोप घेणे गरजेचं आहे. रात्री अंथरूणात गेल्यानंतर बऱ्याचदा झोप येत नसल्यानं तुम्ही वारंवार कुस बदलत राहा. या समस्येतून सुटका मिळवायची असल्यास एक खास पेय झोपण्यापूर्वी प्यायल्यास तुम्हाला झोप येण्यास मदत मिळेल. हे पेय झोपताना १५ मिनिटांपूर्वी प्यावे. यानंतर काही वेळानं तुम्हाला नक्कीच झोप येईल.

**खास पेयाचं नाव काय आहे?**

'डर्टी लेमन ड्रिंक' असं या पेयाचं नाव आहे. बऱ्याच जणांनी या पेयाचं नाव ऐकलेही असेल. हे पेय प्यायल्यानंतर झोप येण्यास मदत होते, याबाबतची माहिती खूपच लोकांना आहे. या ड्रिंकमध्ये लिंबूच्या रसाचा अधिक वापर केला जातो. संशोधनानुसार, लिंबूच्या रसाचं सेवन केल्यास चांगली झोपही येते आणि सोबतच ताणतणाव कमी होण्यासही मदत मिळते. या पेयामध्ये लिंबूव्यतिरिक्त अन्य साम्रगीचाही वापर केला जातो. ज्यामुळे अंथरूणात पडल्या-पडल्या आपल्याला झोप येते.

**'डर्टी लेमन ड्रिंक'मध्ये वापरली जाते 'ही' सामग्री?**

'डर्टी लेमन ड्रिंक'मध्ये लिंबू रसाव्यतिरिक्त अन्य सामग्रीचाही वापर केला जातो. या ड्रिंकमध्ये पाणी, ताज्या हळदीची पेस्ट, गुलाब पाणी, कॅमोमाईलचं फुलाचा वापर केला जातो. या साम्रगीचं मिश्रण करून हे ड्रिंक तयार केलं जातं. या पेयामुळे मानसिक शांतता मिळण्यास मदत होते आणि तुम्हाला झोप देखील येते.

**'डर्टी लेमन ड्रिंक'ची रेसिपी**

**सामग्री :** फिल्टर्ड पाणी, दोन लिंबू, ताज्या हळदीची पेस्ट, गुलाब पाणी, कॅमोमाईल फूल

**ड्रिंक तयार करण्याची पद्धत :** सर्वात आधी एका ग्लासमध्ये फिल्टर्ड पाणी घ्या. त्यामध्ये दोन चमचे लिंबूचा रस मिक्स करा. यानंतर गुलाब पाण्याचे पाच ते सहा थेंब मिक्स करा. हळदीची पेस्ट संपूर्ण मिश्रणात चांगल्या पद्धतीनं एकजीव करा. आता या मिश्रणामध्ये पाच मिनिटांसाठी कॅमोमाईलचं फूल ठेवून द्यावं. त्यानंतर ड्रिंक दुसऱ्या ग्लासमध्ये गाळून घ्या, ही झाली डर्टी लेमन ड्रिंकची रेसिपी.

**डर्टी लेमन ड्रिंक : झोपेसाठी कसं ठरतं फायदेशीर**

'डर्टी लेमन ड्रिंक' तयारी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सामग्रीमध्ये कित्येक औषधी गुणधर्म आहेत. ही औषधी गुणधर्म आपल्या आरोग्याला अतिशय फायदेशीर ठरतात. लिंबूमध्ये शरीर डिटॉक्स करण्यासह मनाला शांतताही देण्याचेही गुणधर्म आहेत. ज्यामुळे आपल्याला झोप येण्यास मदत होते. झोप येण्यासाठी आपल्या मेंदूतील पेशी सक्रिय करण्याचं काम गुलाब पाणी करते. हळदीतील गुणधर्मांमुळे शरीर तणावमुक्त होते. झोपेसाठी कॅमोमाईलचं फूल अतिशय उपयुक्त मानलं जातं. या सर्व सामग्रीचा वापर करून 'डर्टी लेमन ड्रिंक' तयार केलं जातं. या ड्रिंकमुळे झोपेशी संबंधित सर्व समस्या दूर होऊन चांगली झोप येण्यास मदत मिळू शकते.

# डेली डाएटमधून इतक्या कॅलरी करा कमी...




जर तुम्ही हेल्दी असाल आणि तरी सुद्धा तुम्हाला वजन कमी करायचं असेल किंवा फिट रहायचं असेल तर डेली डाएटमधून दररोज काही कॅलरी कमी करून तुम्ही वजन कमी करू शकता. तसेच कॅलरी कमी केल्याने तुमचं आरोग्यही चांगलं राहील. याआधी झालेल्या अनेक रिसर्चमधून ही बाब समोर आली आहे की, लो-कॅलरी डाएटचं सेवन करून आरोग्याशी संबंधित अनेकप्रकारच्या समस्या दूर होतात. अशात तुमचं वय वाढलं तरी तुम्ही तरूण दिसाल.

**डाएटमधून किती कॅलरी कमी कराव्या**

नुकत्याच झालेल्या एका नव्या रिसर्चमधून समोर आले आहे की, डेली डाएटमध्ये दररोज केवळ ३०० कॅलरी कमी करून शरीरात कलेस्ट्रॉलचं प्रमाण, ब्लड प्रेशरचं प्रमाण आणि ब्लड शुगरचं प्रमाण चांगलं होतं. सोबतच अनेकप्रकारच्या मेटाबॉलिज्मशी संबंधित आजार तुमच्या जवळही भटकणार नाहीत. केवळ वेट लॉस नाही तर आरोग्यही चांगलं राहतं द लॅंसेट डायबिटीस अॅन्ड इंडोक्रिनोलॉजी नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित या रिसर्चमध्ये या गोष्टीचं समर्थन करण्यात आले आहे की, कमी कॅलरीचं सेवन केल्याने केवळ वजन कमी होतं असं नाही तर तुमचं आरोग्यही चांगलं राहतं आणि शरीरात कॉम्प्लेक्स मेटाबॉलिक बदलही होत नाहीत. रिसर्चमध्ये ही गोष्ट सिद्ध करण्यात आली आहे की, जर तुम्ही तुमच्या दररोजच्या कॅलरी इनटेकमध्ये कमतरता आणाल तर याने ना केवळ वजनच कमी होईल तर डायबिटीस आणि हृदयाशी संबंधित धोकाही कमी होतो.

**२ वर्ष कॅलरी इनटेकमध्ये २५ टक्के घट**

या रिसर्चमध्ये अभ्यासकांनी २१ ते ५० वयोगटातील २०० महिला आणि पुरूषांची निवड केली आणि त्यांना दोन वेगवेगळ्या ग्रुपमध्ये विभागण्यात आले. एका ग्रुपला सांगण्यात आलं की, त्यांना २ वर्षांपर्यंत कॅलरी रिस्ट्रिक्शनची प्रॅक्टिस करायची आहे. या लोकांना सांगण्यात आले की, ते त्यांना हवं ते खाऊ शकतात. पण एक अट आहे. ती म्हणजे त्यांना त्यांच्या रोजच्या कॅलरी इनटेकमध्ये २५ टक्के घट करायची होती. तेच दुसऱ्या ग्रुपला सामान्य रूपाने खाणं-पिणं करण्यास सांगण्यात आलं.


**७१ टक्के लोकांचं वजन १० टक्के घटलं**

ज्या ग्रुपमधील लोकांना कॅलरी कमी करण्यास सांगण्यात आले होते, त्यांच्यातील जास्तीत जास्त लोक २५ टक्के कॅलरी करण्याचं टार्गेट पूर्ण करू शकले नाहीत आणि २ वर्षात त्यांनी सरासरी कॅलरीमध्ये ११.९ टक्के घट केली होती. जी दररोजच्या ३०० कॅलरीच्या बरोबरीत आहे. अभ्यासकांना आढळलं की, केवळ १ वर्षातच या ग्रुपमधील लोकांच्या कोलेस्ट्रॉल आणि ब्लड प्रेशरमध्ये कमतरता आढळली. सोबतच साधारण ७१ टक्के लोक त्यांचं वजन १० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात यशस्वी ठरले.

**प्रोसेस्ड फूड करा अव्हॉइड**

डाएटमध्ये हेल्दी करणे जसे की, फळ आणि भाज्यांचं जास्त सेवन करावं आणि प्रोसेस्ड फूड खाणं कमी करावं. हे दोन्ही प्रभावी उपाय आहेत. या माध्यमातून तुम्ही कॅलरी कमी करू शकता आणि हेल्दी राहू शकता.

# मूत्रपिंड प्रत्यारोपणास हा आहार आहे फायद्याचा



**भूमध्य सागरी** आहारामुळे ज्या रुग्णात मूत्रपिंड प्रत्यारोपण झाले आहे, त्यांना फायदा होऊ शकतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे. भूमध्य सागरी आहारात जास्त प्रमाणात भाज्या, ऑलिव्ह तेल, प्रथिनांचा मध्यम प्रमाणात वापर या गोष्टींचा समावेश होतो. या आहारामुळे प्रत्यारोपण केलेली मूत्रपिंडे व्यवस्थित काम करतात. याबाबतचे संशोधन क्लिनिकल जर्नल ऑफ द अमेरिकन सोसायटी ऑफ नेफ्रॉलॉजी या नियतकालिकात प्रसिद्ध झाले असून त्यात असे दिसून आले की, मूत्रपिंड प्रत्यारोपणानंतरच्या दहा वर्षांनी एक तृतीयांश रुग्णात मूत्रपिंडे काम करेनाशी झाली. नेदरलँडसमधील युनिव्हर्सिटी ऑफ ग्रॉनिंगेनच्या संशोधकांनी मूत्रपिंड प्रत्यारोपण झालेल्या ६३२ रुग्णांची माहिती घेतली, त्यात त्यांना आहाराविषयी प्रश्न विचारण्यात आले होते. काहींनी भूमध्य सागरी आहार सेवनाचे पालन केले होते. ज्या रुग्णांनी भूमध्य सागरी आहार घेतला, त्यांच्यात मूत्रपिंड प्रत्यारोपण जास्त यशस्वी झालेले दिसून आले. भूमध्य सागरी आहारात मासे, फळे, भाज्या, डाळी, दाणे, बदाम, ऑलिव्ह तेल यांचा समावेश होतो. तसेच मांस व दुग्धजन्य पदार्थ कमी प्रमाणात घेतले जातात. ५.२ वर्षांच्या कालावधीत ११९ रुग्णांच्या बाबतीत मूत्रपिंड निकामी होण्याचे प्रमाण कमी होते. भूमध्य सागरी आहार सेवनात ज्यांना नऊ गुण होते, त्यांची मूत्रपिंडे जास्त चांगली राहिली, ज्यांना दोन गुण होते त्यांच्यातही मूत्रपिंड निकामी होण्याची शक्यता ३० टक्के कमी झाली. भूमध्य सागरी आहार हा हृदयरोग व मूत्रपिंड विकारात उपयोगी असतो. अँटोनियो गोम्स यांनी सांगितले की, भूमध्य सागरी आहाराचे चांगले परिणाम असतात त्यावर आणखी एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. असे असले तरी आहाराच्या मदतीने मूत्रपिंड प्रत्यारोपणास पूरक आहार ठरवताना आहारतज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक ठरते.

# चमकदार, सुंदर आणि मजबूत केसांसाठी लिंबाचा करा वापर

अनेकदा तर इतके कमजोर होतात की, मधून तुटूही लागतात. याचं कारण म्हणजे पावसाळ्यात केस भिजलेले राहणे आणि केसात कोंडात होणे. योग्य प्रमाणात सूर्यप्रकाश आणि हवा न मिळाल्याने केसात आरोग्य बिघडतं. जर तुम्हालाही ही समस्या होत असेल तर त्यासाठी आम्ही तुम्हाला एक सोपा घरगुती उपाय सांगत आहोत. तो उपाय म्हणजे लिंबू.

लिंबातील खास गुण फायदेशीर

लिंबू हे आरोग्यासाठी किती फायदेशीर असतं हे काही तुम्हाला वेगळं सांगायला नको. संक्रमणापासून बचाव करण्यासोबतच याने शरीराचं तापमान संतुलित ठेवण्यास मदत मिळते. शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी देखील डॉक्टर लिंबू पाणी सेवन करण्याचा सल्ला देतात. आरोग्यासोबतच लिंबू केसांसाठीही फायदेशीर ठरतं.

केसांसाठी कसं फायदेशीर?

लिंबाच्या रसात भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी असतात. याने डोक्यातली कोलेजनची निर्मिती वाढवून केसांचं आरोग्य चांगलं ठेवता येतं. तेच यातील ॲसिडमुळे डोक्याच्या त्वचेची चांगली स्वच्छताही होते आणि केसही मजबूत होतात. लिंबात सायट्रिक ॲसिड, मॅग्नेशिअम, कॅल्शिअम आमि फ्लानोएड तत्वही असतात. हे तत्व केसांची चांगली वाढ करतात. लिंबाचा रस तुम्ही केसांवर आणि केसांच्या मुळात लावू शकता. सोबतच इतर वेगळ्या पद्धतीने सुद्धा तुम्ही लिंबाचा रस केसात लावू शकता.

ऑयली केसांसाठी

जर तुमचे केस ऑयली असतील तर लिंबाचा रस केसांच्या मुळात लावा. यासाठी लिंबाचा रस एका वाटीत काढा आणि कापसाच्या मदतीने केसांच्या मुळात चांगल्याप्रकारे लावा. दोन मिनिटांसाठी हलक्या हाताने मसाज करा. १० मिनिटांनी केस शॅम्पूने धुवा. आठवड्यातून एकदा हा उपाय करा.

ड्राय केसांसाठी

ड्राय केसांसाठी वेगळ्या पद्धतीने लिंबाचा वापर करावा लागतो. ड्राय केस हे लवकर गळतात, त्यामुळे त्यांची काळजी घेताना काही गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात. यासाठी अर्ध्या लिंबाच्या रसात १ मोठा चमचा खोबऱ्याचं तेल किंवा ॲलोव्हेरा जेल मिश्रित करा. हे केसांना लावा आणि १० मिनिटांने केस स्वच्छ करा. तुम्हाला हवं असेल तर यात तुम्ही मधही मिश्रित करू शकता.



## संपादकीय

# मार्दवी मार्तंड!




संपादक दिपक मोरेश्वर नाईक




मनमोहन सिंग यांच्यासारखी व्यक्ती जाते तेव्हा त्यांनी काय कमावले, यापेक्षा मागे राहिलेल्यांनी काय गमावले याचा जमाखर्च मांडणे उर्वरितांसाठी उपयोगाचे...

ही २००९ सालातल्या जूनची गोष्ट. विख्यात गायिका शमशाद बेगम यांस पद्माभूषण देण्याचा सोहळा राष्ट्रपती भवनात होता. त्यावेळी एक महिला त्यांच्याजवळ गेली आणि म्हणाली: मी तुमची खूप मोठी चाहती आहे. ते ऐकून सुखावलेल्या शमशाद साहिबा शुक्रिया अदा करत तीस विचारत्या झाल्या: आप क्या करती हो. ती महिला म्हणाली 'काही नाही, मी गृहिणी आहे. त्यावर आश्चर्यचकित झालेल्या शमशाद बेगम यांचा त्या महिलेस प्रश्न होता: यहाँ कैसे? त्या प्रश्नावर एक मंद स्मित करीत ती महिला म्हणाली: मेरे शोहर प्राईम मिनिस्टर है! मनमोहन सिंग हे त्या महिलेचे शोहर. हा कमालीचा साधेपणा ही मनमोहन सिंग यांची आणि त्यांच्या कुटुंबाची ओळख. ती त्यांच्या धवल पंजाबी पेहेरावाइतकी आयुष्यभर निष्कलंक राहिली. एक नोकरशहा, आर्थिक सल्लागार, अर्थभाष्यकार, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि नंतर सलग दहा वर्षे पंतप्रधान ही त्यांच्या आयुष्याची चढती भाजणी तब्बल ७० वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यानंतर आता अनंतात विलीन होईल. हा क्षण मनमोहन सिंग यांच्या निधनाने आपण नक्की काय गमावले याचा आठव समोर मांडण्याचा. सर्वसाधारणपणे या निमित्ताने गौरवांकित गवगवा होईल तो त्यांच्या आर्थिक सुधारणांचा. त्यांनी अर्थमंत्री म्हणून देशास कसे प्रगतिपथावर नेले त्याचा. आणि पंतप्रधानपदावरील त्यांच्या कारकीदीर्चा. तसे होणे योग्यच. शेवटी सामान्यजनांच्या नजरेतून यशाचे मोजमाप हे त्या व्यक्तीने काय कमावले यात असते. तथापि मनमोहन सिंग यांच्यासारखी व्यक्ती ज्यावेळी जाते त्यावेळी त्यांनी काय कमावले यापेक्षा मागे राहिलेल्यांनी काय गमावले याचा जमाखर्च मांडणे उर्वरितांसाठी उपयोगाचे असते.

शालेय वयातच अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून लौकिक मिळवणारे गरीब घरातले मनमोहन कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना, लबाडीच्या राजकारणात हात बरबटवलेले नसताना, पंतप्रधानपदापर्यंतच्या शिखराकडे नजर ठेवत त्या दिशेने आपली कारकीर्द बेतत नसताना त्या पदावर जातात ते या देशातील राजकीय व्यवस्थेचे यश असते. तथापि सत्तासोपानाच्या पायऱ्या न चढता थेट सर्वोच्च पदी नेमली गेलेली व्यक्ती हुकूमशाही वृत्ती दर्शवण्याचा धोका असतो. कारण लोकशाही ही मुंबईतील लोकलसारखी अनेकांस सामावून घेणारी असावी लागते. मनमोहन सिंग यांना कारकीर्दीच्या अंतिम टप्प्यापर्यंत असे काही कोणास सामावून घ्यावे लागले नाही. तरीही लोकशाही मार्गाने निवडून येणाऱ्या नेत्यांपेक्षा मनमोहन सिंग हे सर्वार्थाने अधिक लोकशाहीवादी होते. लोकशाही हे तत्त्व म्हणून सिंग यांच्या अंगी पुरते भिनलेले होते. त्याची प्रमुख उदाहरणे दोन: स्वतः उच्च दर्जाचे अर्थवेत्ते असलेले मनमोहन सिंग जेव्हा पंतप्रधान यासारख्या सर्वोच्च पदी नेमले जातात तेव्हा त्यांचा महत्त्वाचा निर्णय असतो रंगराजन यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञास सल्लागारपदी नेमणे, हा. दुसरे उदाहरण त्यांच्या पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या टप्प्यातले. त्यांचे एकेकाळचे सहकारी मॉंटेकसिंग अहलुवालिया यांच्या पत्नी ईशर यांनी दिल्लीत एका परिसंवादात उपस्थित राहण्याचे निमंत्रण मनमोहन सिंग यांस दिले. विषय अर्थशास्त्र आणि नियोजन यांच्याशी संबंधित असल्याने सिंग त्यास हजर राहिले. त्या वेळी त्यांच्या समोरच त्यांच्या ह्ययूपीएह्ण सरकारच्या आर्थिक धोरणांवर सडकून टीका झाली. त्यात सर्वात धारदार टीकास्त्र चालवणाऱ्या तरुण प्राध्यापकास सिंग यांनी देशाचा अर्थसल्लागार नेमले आणि नंतर त्याच्याकडे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नरपद दिले. रघुराम राजन ही आठवण आजही सांगतात. पंतप्रधानपदावरील व्यक्ती त्यांच्याच नेतृत्वाखालील सरकारवरील टीकेची इतकी सहिष्णू वृत्तीने दखल घेते आणि त्यातील त्रुटी दूर करण्यासाठी टीकाकारांपुढे सहकायार्चा हात मागते हे सच्चा लोकशाहीवादीच करू शकतो.

मनमोहन सिंग असे होते. खरे तर त्यांच्या एका अर्थसंकल्पामुळे या देशाच्या अंगणात लक्ष्मीची पावले उमटली. त्यांनी २४ जुलै १९९१ या दिवशी मांडलेल्या अर्थसंकल्पामुळे देशाची आर्थिक कवाडे सताड उघडली गेली आणि परदेशी गुंतवणुकीचा ओघ भारताकडे वळला. त्यावेळचे पंतप्रधान नरसिंह राव यांनी अर्थसंकल्प मांडला गेला त्याआधी दुपारी एक पत्रकार परिषद घेऊन आयात, गुंतवणूक यावरील अनेक निर्बंध उठवले. यातून 'पंतप्रधान पत्रकार परिषद घेत' ही एकच बाब लक्षात घेणे चुकीचे. पंतप्रधानांनी ही पत्रकार परिषद अर्थसंकल्पाच्या दिवशीच घेतली कारण आपल्या सर्व घोषणांचा अंतर्भाव हा अर्थसंकल्पात होईल हा त्यामागचा राव यांचा विचार. यातून आपल्या मंत्र्यालाही त्याच्या कर्तबगारीचे श्रेय द्यायला हवे, एवढा मोकळेपणा त्यांच्याकडे होता आणि सर्व प्रकाशझोत फक्त आपण आणि आपल्यावरच राहावा ही त्यांची वृत्ती नव्हती हे जसे दिसते तसेच असे काही क्रांतिकारक निर्णय पेलण्याची सिंग यांची क्षमता किती होती हेदेखील दिसून येते. तरीही अर्थशास्त्रातले सर्व काही आपणालाच ठावे असा त्यांचा आविर्भाव कधीही नव्हता. रंगराजन, रघुराम राजन आदींच्या त्यांनी केलेल्या नेमणुकांतून हे दिसून येते. मृदू आणि मस्तवाल या दोन टप्प्यांतच राजकारण्यांस अनुभवण्याची सवय लागलेल्या भारतीयांस सिंग यांच्या रूपाने मृदू तरीही ठाम राजकारणी पाहता आला. आर्थिक विषयांची आणि देशापुढील प्रश्नांची सखोल समज हे या ठामपणामागचे कारण. त्यामुळेच 'व्हेन मनमोहन सिंग स्पीक्स, पीपल लिसन' अशी सहज दाद त्यावेळचे अमेरिकी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी दिली होती. या दोघा नेत्यांची विशेष मैत्री असल्याचे ऐकिवात नाही. पण जगभरातील नेत्यांच्या पहिल्या पसंतीचे नेते असा लौकिक त्यांनी २०१० पर्यंत कमावल्याचे 'न्यूजवीक' ने नोंदवले होते.

पंतप्रधानपदाच्या पहिल्या कारकीर्दीत अणुकराराच्या मुद्द्यावर त्यांनी आपले पंतप्रधानपदच नव्हे तर सारे सरकारच पणास लावले. ''माझे सरकार पडले तरी बेहत्तर; पण अणुकरार मागे घेणार नाही'' ही अशक्त म्हणून हिणवल्या गेलेल्या सिंग यांची कृती पुढील काळात स्वतःचे सरकार वाचवण्यासाठी चार-चार सुधारणा विधेयके मागे घेणाऱ्या नेत्यांस काही शिकवू शकली नाही, यास काय म्हणावे? दुसरे असे की त्यावेळी विरोधी पक्षात असलेल्यांनी सिंग यांच्या या अणुकरारावर अश्लाघ्य शब्दांत टीका केली आणि नंतर सत्तेवर आल्यावर त्याच अणुकराराचा पाठपुरावा केला. तरीही एव्हाना पंतप्रधानपदावरून पायउतार झालेल्या सिंग यांनी ''बघा... शेवटी मीच बरोबर ठरलो'' असा परिचित राजकीय विजय कधीही साजरा केला नाही. तशी संधी खरे तर २०१४ नंतर सिंग यांच्यासमोर अनेकदा आली. मग तो 'मनरेगा'चा मुद्दा असो वा 'आधार' कार्ड असो वा 'वस्तू व सेवा कर (जीएसटी)' असो. ज्यांनी 'मनरेगा'स ''मूर्तिमंत भ्रष्टाचार'' म्हटले, 'आधार' कार्ड कल्पनेस ''घटनाबाह्य'' ठरवले आणि 'जीएसटी' ''होऊ देणार नाही'' असा निर्धार केला, त्यांच्यावरच या सर्व योजना राबविण्याची वेळ आली. हा खरा काव्यात्मक न्याय.

म्हणजे मनमोहन सिंग यांनी जे जे केले ते ते तसेच नंतरच्या काळात राबवले गेले. तथापि हे त्यावेळेस सिंग यांच्या काँग्रेस पक्षास कळले नाही, हे खुद्द मनमोहन सिंग यांचे तसेच देशाचेही दुर्दैव. राहुल गांधी यांची त्या काळातील अध्यादेश फाडण्याची तडफदार (?) कृती आणि सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखालील 'राष्ट्रीय सल्लागार परिषद' यामुळे सिंग यांचा अधीक्षेप होत गेला हे अमान्य करता येणार नाही. ज्या काँग्रेस पक्षाने सिंग यांस पंतप्रधानपद दिले त्याच काँग्रेस पक्षाच्या धुरीणांनी या पदावरील सिंग यांस दुसऱ्या खेपेस सन्मानाने काम करू दिले नाही. आज काँग्रेस राजकीय पक्ष म्हणून जी तळमळ दाखवतो त्याच्या निम्मे जरी शहाणपण तो पक्ष सिंग यांच्या दुसऱ्या खेपेस दाखवता तर त्या पक्षाची आज ही दशा न होती. सिंग यांचे मोठेपण असे की हे सर्व त्यांनी सहन केले आणि कधीही पक्षांतर्गत वा बाहेरील विरोधक यांच्याविषयी अवाक्षर काढले नाही. विरोधकांनी तर त्यावेळी अण्णा हजारेदी बुणग्यांना पुढे करून मनमोहन सिंग यांस घायाळ केले आणि बाबा रामदेव यांच्यासारख्यांनी त्यावेळी सिंग यांस अर्थशास्त्रावर सुनावले.

भारतीय राजकारणाचा हा तळबिंदू होता. त्यात मनमोहन सिंग यांच्यासारखी सभ्य, सुसंस्कृत व्यक्ती गुरफटली गेली हा आपला राजकीय दैवदुर्विलास. हे सर्व हलाहल मनमोहन सिंग यांनी सहज प्राशन केले. तरीही ते कधी कडवट झाले नाहीत. यंदा एप्रिल महिन्यात त्यांची राज्यसभा मुदत संपली त्यावेळी 'बडबड बहरातील मौनी' (४ एप्रिल) या संपादकीयाद्वारे त्यांच्या कारकीदीर्चा यथोचित आढावा घेतला. आता ते गेले. संत ज्ञानेश्वरांचे 'पसायदान' मातंर्डाचे वर्णन तापहीन असे करते. म्हणजे आपल्या तेजाने इतरांस न जाळणारा सूर्य. मधुरमार्दवी मातंर्डास मनःपूर्वक आदरांजली.

# दिल है छोटासा, छोटीसी आशा



बदलापूर येथे झालेल्या अत्याचाराची घटना ताजी असतानाच, कल्याण आणि राजगुरूनगर येथे अल्पवयीन मुलींवर अत्याचार करून हत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. महाराष्ट्र हादरून गेला आहे. कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत. पंधराशे रुपये खात्यावर पाठवून लाडक्या बहिणींचे मतदान घेणाऱ्या सरकारला या बहिणींची आणि त्यांच्या लेकींची सुरक्षा महत्त्वाची का वाटत नाही? याकडेही सत्ताधाऱ्यांचे लक्ष वेधण्याची गरज आहे.

बदलापूरच्या घटनेतील सत्य बाहेर येण्यापूर्वीच आरोपीचा एन्काऊंटर करण्यात आला. या घटनेतील इतर आरोपी आणि मुख्य सूत्रधार, यांचे काय झाले हे कळण्यापूर्वीच कल्याणमध्ये लैंगिक अत्याचार करून बालिकेचा खून करण्यात आला. त्यापाठोपाठ लोणावळ्यात पोलीस कर्मचाऱ्याने बालिकेसोबत लैंगिक चाळे केले. राजगुरूनगरमध्ये देखील दोन सख्ख्या बहिणींचा खून करण्यात आला; त्यापैकी एका बहिणीवर लैंगिक अत्याचार केला. बदलापूर आणि कोलकातातील घटनांनंतर आपण कामाच्या ठिकाणी होणारी लैंगिक हिंसाविरोधी कायदा आणि विशाखा समितीची चर्चा केली होती. याबाबत नव्याने आलेल्या सरकारमध्ये काही सकारात्मक चर्चा आणि भूमिका आवश्यक होत्या, काही धोरणात्मक निर्णय घेऊन राज्यातील शिक्षण संस्था, खासगी संस्था, क्लासेस, दुकाने, सरकारी कार्यालय, खासगी कार्यालय जिथे-जिथे स्त्रिया मोठ्या संख्येने कामाला जातात, तिथे-तिथे अंतर्गत तक्रार निवारण समिती म्हणजेच विशाखा समिती कार्यरत आहे किंवा नाही याची माहिती जनसामान्यांपर्यंत मिळणे गरजेचे होते. परंतु तसे काहीच घडले नाही. निवडून आलेल्या सत्तेतील किंवा विरोधी बाकावरील कोणाही आमदाराला याबाबत प्रश्न विचारावा, चर्चा घडवून आणावी, असे वाटले नाही. या दोन्ही विधानसभा आणि विधान परिषदमध्ये होणाऱ्या कामकाजाला विधिमंडळाचे कामकाज म्हणतात. म्हणजेच कायदेमंडळाचे कामकाज म्हणतात. पंधराशे रुपये खात्यावर पाठवून लाडक्या बहिणींचे मतदान घेणाऱ्या सरकारला या बहिणींची आणि त्यांच्या लेकींची सुरक्षा महत्त्वाची का वाटत नाही?

महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये आणि त्यानंतर आलेल्या महायुतीच्या सरकारमध्ये गेल्या दहा वर्षांत सरकारला बालहक्क आयोग नेमायला फुरसत मिळालेली नाही. २००५च्या बालहक्क संरक्षण कायद्यानुसार २००७पासून राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर बाल हक्क संरक्षण आयोग नेमणे सरकारवर बंधनकारक आहे. या आयोगाने बालिकांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारविरोधी कायद्याची पोक्सो २०१२ आणि बालकांचा शिक्षण हक्क कायदा २००९, जुवेनल जस्टीस एक्ट २०१५ (मुलांची काळजी व संरक्षण कायदा २०१५) या कायद्यांच्या राज्यात आणि राष्ट्रीय स्तरावर अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे बंधनकारक आहे. त्याचबरोबर बालकामगार व बालविवाह याबाबत ही कारवाई करणे अपेक्षित आहे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर कायद्याने अस्तित्वात आणावयाचे हे आयोग नेमलेलेच नाहीत ही फार गंभीर गोष्ट आहे. राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी याबाबत त्वरित कार्यवाही करून आयोग नेमायला हवेत.

वाजतगाजत शक्ती बिलाची चर्चा करण्यात आली. आश्वासने देण्यात आली. चर्चा करण्यात आल्या. सूचना मागविण्यात आल्या, पण अजूनही त्याचे कायद्यात रूपांतर झालेले नाही. याकडेही सत्ताधाऱ्यांचे लक्ष वेधण्याची गरज आहे. विरोधकांनी याबाबत सरकारला घेरणे अपेक्षित आहे. २००८मध्ये तामिळनाडू येथून दाखल झालेल्या एका प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राधाकृष्णन आणि दीपक मिश्रा यांच्या खंडपीठाने न्यायनिवाडा देताना देशातील सर्वच राज्य सरकार आणि केंद्र शासित प्रदेशांना आठ मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यातील एकही सूचना महाराष्ट्रात शासनाने शासन स्तरावर निर्णय करून त्याची अंमलबजावणी केलेली दिसत नाही. जोपर्यंत छेडछाडीचा गुन्हा हा दखलपात्र गुन्हा होत नाही, छेडछाड काढणाऱ्यांना वेळीच आळा बसवला जात नाही, तोपर्यंत स्त्रियांना सुरक्षितता मिळणार नाही. छेडछाड करणारी व्यक्ती पुढे विनयभंग करणे, त्यातून जामिनावर सुटला की, उद्या रेप करून सुद्धा सुटू शकते याचे भान कायदेमंडळाला, पोलिसांना, न्यायासनाला असायला हवे.

ज्यांच्याबाबत या घटना घडतात ते गरीब, स्थलांतरित, मागास जनजातीतील, कामगार वर्गातील, गरीब कुटुंबातील आहेत. या छोट्या मुली यांचे मतदार नाहीत म्हणून का त्यांच्या सुरक्षेचा विषय राजकीय विषय होऊ शकत नाही?

महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांमध्ये माहिती घेतली असता, बाल न्याय मंडळाकडे अगदी कमी १५ आणि जास्तीत जास्त वीस प्रकरणे दर महिन्याला येतात. ही आकडेवारी आपल्याला धोक्याची सूचना देते. आरोपीच्या बाजूने वकीलपत्र घेणाऱ्या एका वकिलांशी चर्चा केली असता, अनैतिक संबंध, जमीन आणि पैशाच्या वादाच्या संदर्भाने लहान बालकांचा वापर खोटे गुन्हे दाखल करण्यासाठी केला जातो, असेही बोलले जाते. बदललेल्या अर्थव्यवस्थेत स्त्रिया आणि बालकांच्या लैंगिकतेचा हा बाजार तर मांडला जात नाही ना? हे तपासायला हवे. नुकतेच आदिवासी समूहातून आलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विशेष साहस दाखवलेल्या बालकांचा सन्मान केल्याची बातमी येते आणि आपला ऊर अभिमानाने भरून येतो, तर त्याच वेळेला महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात एकाच वेळी तीन अत्याचाराच्या घटना जीवाचा थरकाप उडवतात. या विरोधाभासी सामाजिक वास्तवाचे भान आपण सजग नागरिक म्हणून ठेवायला हवे. ज्यांच्या संदर्भाने या घटना घडत आहेत. त्यांच्यासोबत आपण केवळ समाज माध्यमांवरती चर्चा करण्यापेक्षा, तोंड दुखी केलेली इमोजी पाठवण्यापेक्षा महिला मंडळ, बचत गट यातील महिलांनी त्यांना कोर्टापर्यंत जाऊन साक्ष नोंदवायला, त्यांचे मनोबल खचणार नाही, यासाठी त्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळवून द्यायला हवे. या सगळ्या घटनांनंतर होणाऱ्या आर्थिक नुकसानीची भरपाई शासनाकडून त्वरित मिळून द्यायला हवी. त्या कुटुंबाची गोपनीयता आणि त्यांचे खासगी आयुष्य अबाधित राहायला हवे यासाठी समाज म्हणून आपण संवेदनशील होऊया. सरकारी वकील, पोलीस आणि यांचा न्यायासन यांच्या कामकाजात कोणताही राजकीय हस्तक्षेप होणार नाही, आरोपीचे एन्काऊंटर होणार नाही, न्यायदानाची प्रक्रिया नीट पार पडेल, साक्षीदार फोडले जाणार नाहीत, आरोग्य विभाग फितूर होणार नाही, यावर बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे. कल्याण, लोणावळा, बदलापूर, राजगुरूनगर, सातारा, कोल्हापूर अशा राज्यातील सर्वच जिल्ह्यात दाखल असणाऱ्या किमान एकेका प्रकरणांमध्ये राजकीय पक्षाशिवाय सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी पाठपुरावा करणे गरजेचे आहे. कारण पक्ष बदलला की, भूमिका बदलणाऱ्या महाराष्ट्रातील तथाकथित अनेक तडफदार महिला नेत्यांची आता आम्हाला भीती वाटते.

# दहशतवादी संघटना सक्रिय



वेगवेगळ्या मार्गांनी दहशतवादी संघटना देशात अस्थैर्य माजविण्याचा प्रयत्न करत आहेत. अलीकडेच बेरोजगार तरुणांच्या बँक खात्यांमधून कोट्यवधींच्या रकमांची उलाढाल झाल्याचे निदर्शनास आले आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी १४ बेनामी खात्यांतून आरटीजीएसद्वारे पैसे पाठवण्यात आलेल्या २५५ कंपन्यांची यादीच प्रसिद्ध केली आहे. नक्षलवादी संघटनांबरोबर आता दहशतवादी संघटनाही भाजप सरकारविरोधात सक्रिय झाल्या आहेत. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला सत्तेतून हटवण्यासाठी विविध मार्गांनी सुरू असलेल्या प्रयत्नांना यश मिळत नाही हे पाहून विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शक्ती आता हिंसाचाराच्या साथीने असंतोष माजविण्याचे कारस्थान रचत आहेत. मालेगाव येथील काही बँकांच्या शाखांमध्ये अचानक जमा झालेल्या कोट्यवधींच्या रकमेचे प्रकरण उघडकीस आल्याने शहरी नक्षलवादी शक्तींच्या बरोबर दहशतवादी संघटनाही देशात अस्थैर्य माजविण्याचा कसा प्रयत्न करीत आहेत हे उघड झाले आहे. यातील दुर्दैवाचा भाग असा की भारतीय जनता पक्षाच्या विरोधातील काँग्रेससह अनेक पक्ष या शक्तींना आपला वापर करू देत आहेत. मालेगाव येथील महाराष्ट्र बँक आणि नाशिक मर्चंट्स सहकारी बँकेच्या शाखांमध्ये बेरोजगार तरुणांच्या खात्यांमधून कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याचे निदर्शनाला आल्यानंतर दहशतवादविरोधी तपास पथकाकडून याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. बेनामी खात्यांतून एखाद्याच्या बँक खात्यात पैसे जमा होणे या वरवर फारशा गंभीर न वाटणाऱ्या प्रकारामागे दहशतवादी संघटनांचे लागेबांधे असावेत असा विचार प्रथमदर्शनी कोणाच्याही मनात येऊ शकणार नाही. मात्र या आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे दुबईपर्यंत पोहोचले असल्याचे आढळून आले आहे. मेहमूद भागड या व्यक्तीने २०१ बँक खात्यांचा वापर करून थोडेथोडके नव्हे तर १ हजार कोटींचे आर्थिक व्यवहार केले असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. या गंभीर आर्थिक गैरव्यवहाराचा भांडाफोड करणारे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी १४ बेनामी खात्यांतून आरटीजीएसद्वारे पैसे पाठवण्यात आलेल्या २५५ कंपन्यांची यादीच प्रसिद्ध केली आहे. ही यादी पाहिल्यावर सरकार अस्थिर करण्यासाठी कोणत्या स्तरावर हालचाली सुरू आहेत याची कल्पना येऊ शकेल. ज्या लोकांच्या खात्यात अचानक मोठी रक्कम जमा झाली त्यांनीच तक्रार केल्यानंतर या प्रकरणाचे गांभीर्य हळूहळू लक्षात येणे सुरू झाले. फक्त महाराष्ट्रातील बँक खात्यात बेनामी खात्यातून मोठ्या प्रमाणात पैसा आला नसून २१ राज्यांतील २५१ बँक खात्यांमध्ये या पद्धतीने रक्कम जमा करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या विरोधात व्होट जिहादचे आवाहन करण्यात आले होते. तसे फतवे काढण्यात आले होते. मशिदींमधून धर्मगुरूंद्वारे महाविकास आघाडीच्या कोणत्या उमेदवारांना मतदान करायचे याच्या याद्याच जाहीर करण्यात आल्या होत्या. महाराष्ट्रात झालेल्या व्होट जिहादच्या आवाहनाचा फटका महायुतीला मोठ्या प्रमाणात बसला. धार्मिक आधारावर संघटित पद्धतीने मतदान करण्याचे आवाहन करणाऱ्या मौलवींना महाविकास आघाडीच्या एकाही नेत्याने विरोध केला नाही. व्होट जिहादच्या पॅटर्नमुळे महायुतीच्या १३-१४ उमेदवारांना कसे पराभूत व्हावे लागले याची संपूर्ण आकडेवारी यापूर्वीच प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे त्याची पुनरावृत्ती करणे योग्य ठरणार नाही. लोकसभेत व्होट जिहादच्या पॅटर्नला मिळालेल्या मोठ्या यशामुळे भारतीय जनता पक्षाच्या विरोधात सातत्याने कार्यरत असणाऱ्या अनेक मुस्लिम संघटनांना चेव चढला. विधानसभा निवडणुकीत अखिल भारतीय मुस्लिम वैयक्तिक कायदा मंडळाचे (मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड)चे प्रवक्ते सज्जाद नोमानी यांनी मुस्लिम समुदायातर्फे अनेक मागण्या महाविकास आघाडीच्या नेत्यांकडे केल्या. नोमानी यांनी महाविकास आघाडीकडे कोणत्या मागण्या केल्या आणि महाविकास आघाडीने त्या मागण्या मान्य केल्या, याचा गौप्यस्फोट विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात त्यावेळचे उपमुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. मुस्लिम समाजाला अन्य मागासवर्गीय समाजाच्या (ओबीसी) कोट्यातून दहा टक्के आरक्षण द्या, २०१२ ते २०२४ या दरम्यान राज्यात जेवढ्या दंगली झाल्या त्यातील मुस्लिम तरुणांच्या विरोधातील खटले काढून घ्या, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घाला, आदी सतरा मागण्या मुस्लिम उलेमांनी महाविकास आघाडीकडे अधिकृत पत्र देऊन केल्या होत्या. लोकसभेत मुस्लिम समाजाच्या ज्या लोकांनी भाजपला मतदान केले त्यांना शोधून काढा आणि त्यांच्यावर बहिष्कार घाला, असे आवाहनही सज्जाद नोमानी यांनी जाहीरपणे केले होते. म्यानमारमधील मुस्लिमांवर होणाऱ्या अन्यायाचा निषेध करण्यासाठी ११ ऑगस्ट २०१२ रोजी मुंबईत 'रझा अकादमी'तर्फे भेंडी बाजार ते आझाद मैदान असा मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चाला येणाऱ्यांची संख्या कमी असेल अशी माहिती मिळाल्याने पोलिसांनीही त्यानुसार बंदोबस्त लावला होता. परंतु, हा मोर्चा आझाद मैदानात पोहोचला तेव्हा हजारोंच्या संख्येने जमाव मोर्चात सामील झाला. काहीवेळानंतर परिस्थिती हाताबाहेर गेली आणि जमावातून पोलिसांवरच दगडफेकीला सुरुवात झाली. परिस्थिती नियंत्रणात आणणे पोलिसांना कठीण जाऊ लागले. दगडफेकीचे रूपांतर दंगलीत झाले. यात अनेक पोलीस अधिकारी, कर्मचारी जखमी झाले. जमावाने दक्षिण मुंबईतील अमर जवान ज्योती स्मारकाची नासधूस केली. महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या अब्रूवर हात घातला गेला. अशा घटनांमधील आरोपींवरचे खटले काढून घेण्याची मागणी उलेमांनी केली आणि महाविकास आघाडीने ती मान्यही केली. निवडणुका जिंकण्यासाठी आपण कोणत्या थराला जात आहोत, याचे किती घातक परिणाम होतील, याची तमा महाविकास आघाडीने बाळगली नाही. शहरी नक्षलवादी कारवायांमध्ये सहभाग असलेल्या अनेक संघटना राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेत सहभागी कशा झाल्या होत्या याचे पुरावे पोलीस यंत्रणांना मिळाले आहेत. काठमांडू येथे शहरी नक्षलवादी संघटनांच्या म्होरक्यांच्या बैठकीत काय काय शिजले याची माहितीही हळूहळू बाहेर येत आहे. विरोधकांना भारतीय जनता पक्षाला विरोध करण्याचा हक्क संविधानानेच दिला आहे. मात्र हा विरोध करताना आपण देशविरोधी शक्तींच्या हातातील बाहुले बनणार नाही, याची दक्षता विरोधकांनी घ्यावी, एवढेच सांगणे आहे.

# कल्याणमध्ये पालिकेच्या खासगी स्वच्छता कामगारांकडून रेल्वे प्रवाशांची लूट



■ **कल्याण :** कल्याण रेल्वे स्थानक भागात प्रवाशांची लूट कल्याण डोंबिवली पालिकेशी करारबध्द असलेल्या एका खासगी एजन्सीचे स्वच्छता कामगार करत होते. या विषयीच्या तक्रारी वाढल्याने आणि हा लुटमारीचा प्रकार कल्याण डोंबिवली पालिकेचे मुख्य स्वच्छता अधिकारी वसंत देगलुरकर यांनी सोमवारी स्वता पाहिला. त्यानंतर देगलुरकर यांच्या तक्रारीवरून मंगळवारी महात्मा फुले पोलीस ठाण्यातील पोलिसांनी खासगी कामगारांविरुध्द गुन्हा दाखल केला. मुख्य स्वच्छता अधिकारी देगलुरकर यांनी सांगितले, पालिका हद्दीतील प्लास्टिक आणि इतर कचरा विलगीकरणासाठी पालिकेने मे. इन्फ्रान्ट्री सिक्युरीटी ॲन्ड फॅसिलिटीज एजन्सी बरोबर करार केला आहे. या एजन्सीचे खासगी कामगार पालिका हद्दीत शहर स्वच्छ ठेवण्याबाबतची कार्यवाही करतात. या एजन्सीने पालिकेने करारात घालून दिलेल्या अटीशर्तीप्रमाणे काम करायचे आहे. पादचारी रस्त्याने जाताना रस्त्यावर थुंकला, रस्त्यावर कचरा केला अशा नागरिकांवर कारवाई करण्याचे अधिकार या कामगारांना आहेत. या कामगारांकडे पालिकेची ओळखपत्रे आहेत.

काही महिन्यांपासून मे. इन्फ्रान्स्टी एजन्सीचे कामगार कल्याण रेल्वे स्थानक भागात सकाळच्या वेळेत रेल्वे स्थानकातून बाहेर येणाऱ्या प्रवाशांना आम्ही पालिकेचे कामगार आहोत अशी ओळखपत्रे दाखवून त्यांना दटावत होते. त्यांच्यावर तुम्ही रस्त्याने चालताना कचरा केला, तुमच्याजवळ प्रतिबंधित वस्तू आहेत अशा प्रकारचे ठपके ठेऊन अवाजवी पैशांची मागणी करत होते. याविषयी अनेक तक्रारी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्याकडे आल्या होत्या. रेल्वे पोलिसांनी याविषयी पालिकेला कळविले होते, असे देगलुरकर यांनी सांगितले.

आयुक्तांनी खासगी कामगारांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. सोमवारी सकाळीच देगलुरकर वेशांतर करून कल्याण रेल्वे स्थानक भागात आले. ते खासगी कामगारांवर पाळत ठेऊन होते. कामगार रेल्वे स्थानकातून बाहेर येणाऱ्या प्रवाशांना त्रास देत असल्याचे त्यांना आढळले. तक्रारींची खात्री पटल्यावर देगलुरकर यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात मे. इन्फ्रान्ट्री एजन्सीने पालिके बरोबरच्या करारातील अटींचा भंग केला. पालिका आणि प्रवाशांची फसवणूक केली म्हणून कामगार सोनु सिंग आणि इतरांवर पोलीस ठाण्यात तक्रार केली. या एजन्सीला यापूर्वीही करार भंगप्रकरणी दंड ठोठावला होता, असे देगलुरकर यांनी सांगितले. या प्रकरणाची कागदपत्रे आपल्याकडे आली की तपास सुरू करणार आहोत, असे तपास अधिकारी उपनिरीक्षक घाटगे यांनी सांगितले.

# 3 महिन्यांत ५७५ कोटीच्या मालमत्ता कर वसुलीचे आव्हान



■ **कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिकेच्या २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये मालमत्ता कराचा लक्ष्यांक ७९८ कोटी आहे. मार्च ते नोव्हेंबर या कालावधीत पालिकेने २२३ कोटीची कर वसुली केली आहे. मे, ऑक्टोबरमधील लोकसभा, विधानसभा निवडणूक कामांमध्ये पालिका कर्मचारी व्यस्त राहिला. त्याचा कर वसुलीवर परिणाम झाला. त्यामुळे मालमत्ता कर वसुलीचा निर्माण झालेला ५७५ कोटीचा खड्डा भरून काढण्याचे मोठे आव्हान येत्या तीन महिन्याच्या कालावधीत कर्मचाऱ्यांसमोर आहे.

पालिकेच्या महसुलात मालमत्ता कर हा सर्वाधिक महसुली उत्पन्नाचा स्त्रोत आहे. मागील मार्च ते नोव्हेंबर कालावधीत कर विभागाच्या कर्मचाऱ्यांनी २२३ कोटीचा मालमत्ता कर वसूल केला. यंदाचा मालमत्ता कराचा लक्ष्यांक ७९८ कोटी आहे. येत्या जानेवारी ते मार्च अखेरपर्यंत कर्मचाऱ्यांना मालमत्ता कराचा लक्ष्यांक पूर्ण करण्यासाठी ५७५ कोटीची कर वसुली करावी लागणार आहे.

मागील निवडणुकांमुळे निर्माण झालेला कर वसुलीचा खड्डा भरण्यासाठी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, उपायुक्त स्वाती देशपांडे यांनी कर थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करणे, त्या माध्यमातून कर वसुली करण्याचे आदेश दिले आहेत. ही मोहीम प्रभागस्तरावर साहाय्यक आयुक्त, कर कर्मचारी राबवित आहेत. मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये पालिकेने मालमत्ता कराची ३१० कोटीची वसुली केली होती. अभय योजनेच्या माध्यमातून पालिका तिजोरीत १०० कोटीचा महसूल जमा झाला होता.

मागील वर्षी लवकरच अभय योजना लागू करण्यात आली होती. यंदा ही योजना १४ डिसेंबर ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंत राबविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या माध्यमातून पालिकेकडे मालमत्ता कर थकबाकीदारांकडून अधिकची कर वसुली झाली तर ५७५ कोटीच्या वसुलीला या योजनेतील कर वसुलीचा मोठा आधार मिळणार आहे. अंदाजपत्रकातील ७९८ कोटीचा लक्ष्यांक पूर्ण करणे प्रशासनाला शक्य होणार आहे.

दहा प्रभागस्तरावरील मालमत्ता कर वसुलीतून ३७२ कोटीचे येणे बाकी आहे. या रकमेतील ४९ कोटीची रक्कम कर्मचाऱ्यांनी वसुल केली आहे. या रकमेत कर थकबाकीदारांची वसुली करण्यात आली आहे. प्रभाग कर्मचाऱ्यांनी कर वसुलीला प्राधान्य देण्याचे प्रशासनाचे आदेश आहेत.

# अमेरिकन वकिलातीत बनावट कागदपत्र सादर करणाऱ्या चौघांविरोधात गुन्हा




■ **मुंबई :** अमेरिकन वाणिज्य वकिलातीमध्ये बनावट कागदपत्र सादर करून व्हिसा मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या गुजरातमधील नागरिकासह तीन दलालांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी दलालांनी या व्यक्तीला बनावट कागदपत्रे पुरवल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले. याप्रकरणी बीकेसी पोलीस अधिक तपास करीत आहेत. गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातील रहिवासी निरंजन पटेल (३६) गेल्या अनेक दिवसांपासून अमेरिकेत जाण्यासाठी व्हिसा मिळवण्याचा प्रयत्न करीत होता. तो सोमवारी अमेरिकन वाणिज्य वकिलातीमध्ये मुलाखतीसाठी गेला होता. त्याने सादर केलेल्या दस्तऐवजांच्या पडताळणीदरम्यान अधिकाऱ्यांना काही विसंगती आढळली. दरम्यान, यापूर्वी पटेलने कॅनडाच्या व्हिसासाठी अर्ज केला होता, परंतु त्यावेळी खोटा अमेरिकन व्हिसा सादर केल्यामुळे त्याचा अर्ज फेटाळला होता. ही बाब समजल्यानंतर वकिलातीमधील अधिकाऱ्यांची त्याची कसून चौकशी केली. बनावट कागदपत्र कोठे तयार केली, याबाबत त्याला विचारणा करण्यात आली. आपल्याला संबंधित बनावट कागदपत्रे तीन दलालांनी दिली असून त्यांची नावे सोनल, उदय रावल आणि पियुषकुमार पटेल असल्याचे त्याने सांगितले. आरोपी दलालांनी त्याला अमेरिकेचा व्हिसा मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते, असे तक्रारी म्हटले आहे. सहाय्यक विभागीय सुरक्षा अधिकारी जेम्स बिलिंगटन यांनी याप्रकरणी बीकेसी पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी पटेल व तीन दलालांविरोधात गुन्हा दाखल केला. आरोपीविरोधात बनावट कागदपत्र तयार करणे, ती सादर करणे, फसवणूक करण्याचा प्रयत्न करणे अशा विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# कल्याण तहसीलदार कार्यालयातील महसूल साहाय्यक शेतकऱ्याकडून लाच घेताना अटक



या तक्रारीप्रमाणे मंगळवारी तक्रारीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथकाने पंचांसमक्ष पडताळणी केली. या पडताळणीत महसूल साहाय्यक स्वतासाठी २० हजार आणि वरिष्ठांसाठी २० हजार रुपए मागत असल्याचे निष्पन्न झाले.बुधवारी संध्याकाळी लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांच्या सूचनेप्रमाणे शेतकऱ्याने महसूल साहाय्यक पाटील यांना लाचेची रक्कम देण्याचे कबुल केले. कल्याण तहसीलदार कार्यालयातील महसूल साहाय्यक कक्षाच्या पाठीमागील बाजूस तक्रारदार शेतकऱ्याकडून ४० हजार रूपयांची लाच घेताना पथकाने संतोष पाटील यांना रंगेहाथ पकडले. महात्मा फुले पोलीस ठाण्यात याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महसूल साहाय्यक पाटील यांच्या विरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

■ **कल्याण :** कल्याण तालुक्यातील रायते येथील एका जमीन खरेदी प्रकरणात जमीन मालक शेतकऱ्याकडून ४० हजार रूपयांची लाच घेताना येथील तहसीलदार कार्यालयातील एका महसूल साहाय्यकाला बुधवारी संध्याकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ठाणे विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. संतोष महादेव पाटील (४६) असे लाच घेताना पकडलेल्या महसूल साहाय्यकाचे नाव आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक गजानन राठोड, संजय गोवीलकर, पोलीस निरीक्षक रूपाली पोळ यांच्या पथकाने ही कारवाई केली.

पोलीस निरीक्षक रूपाली पोळ यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यातील तक्रारीत दिलेली माहिती अशी, तक्रारदार शेतकरी यांनी कल्याण तालुक्यातील रायते गावी दहा गुंठे जमीन खरेदी केली आहे. या जमिनीचा सातबारा उतारा आणि फेरफार स्वताच्या नावे नोंद होण्यासाठी तक्रारदार शेतकरी महसूल कार्यालयात प्रयत्नशील होता. सातबारा, फेरफार नोंद होण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जमीन खरेदीदार शेतकऱ्याकडे शेतकरी असल्याचा तहसीलदारांचा दाखला आवश्यक होता. त्याशिवाय ही नोंद होणार नाही असे खरेदीदाराला महसूल विभागाने कळविले होते.

खरेदीदार शेतकऱ्याने या दाखल्यासाठी आपल्या मूळ गावी असलेल्या उत्तरप्रदेशातील जौनपूर जिल्ह्यातील केराकत तहसीलदारांचा दाखला मिळण्याची मागणी त्या कार्यालयाकडे केली होती. त्याप्रमाणे तो दाखल कल्याण तहसीलदार कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. जमीन खरेदीदार शेतकऱ्याची शेतकरी दाखल्यासह सातबारा सदरी नोंद होण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा, असा प्रस्ताव रायते तलाठी यांना पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तहसीलदार कार्यालयातील महसूल साहाय्यक संतोष पाटील यांनी तक्रारदाराकडे चाळीस हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली होती. सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही आपल्याकडे पैसे मागितले जात असल्याने जमीन खरेदीदार शेतकऱ्याने याप्रकरणी गेल्या शनिवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ठाणे विभागाकडे तक्रार केली.

# कचऱ्यावर शुल्क आकारणीचा निर्णय अनिर्णित, महापालिका निवडणुकीमुळे कर आकारण्याची शक्यता कमी




■ **मुंबई :** मुंबईकरांकडून कचरा संकलन शुल्क वसूल करण्याबाबतचा निर्णय लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. 'स्वच्छ भारत अभियाना' अंतर्गत स्वच्छता सर्वेक्षणाचा भाग म्हणून मुंबईकरांवर कचरा संकलन शुल्क आकारण्याची चर्चा गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. यावेळी हे शुल्क लावण्यासाठी घनकचरा विभागाने तयारी केली होती. त्या पार्श्वभूमीवर पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे सोमवारी याबाबत सादरीकरणही करण्यात आले. मात्र शुल्क आकारण्याबाबत कोणत्याही निर्णय अद्याप झालेला नाही. लवकरच पालिकेची निवडणूक जाहीर होण्याची शक्यता असून राजकीय पक्षांकडून आदीच कचरा संकलन शुल्काला विरोध झाला आहे.

परिणामी, शुल्क आकारण्याची शक्यता कमी आहे. मुंबईकरांवर कचरा संकलन शुल्क आकारण्याची तयारी घनकचरा व्यवस्थापन विभागाने सुरू केली आहे. मात्र या चर्चेमुळे राजकारण तापले आहे. शुल्क लावण्यास अद्याप सुरूवात झालेली नसतानाच सर्व राजकीय पक्षांनी असा कर वसूल करण्याच विरोध सुरू केला आहे. या पार्श्वभूमीवर पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या दालनात सोमवारी घनकचरा विभागाने सादरीकरण करण्यात आले. मात्र या बैठकीत कचरा शुल्क लावण्याबाबत कोणताही निर्णय झाला नाही. दरम्यान, येत्या काही महिन्यात पालिकेची निवडणूक लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे कचरा संकलन शुल्क लागण्याची शक्यता कमी असल्याचीही चर्चा आहे. तसेच असा कर लावायचा झाल्यास तो मालमत्ता करातून वसूल करायचा की वेगळ्या पद्धतीने वसूल करायचा याबाबतही निर्णय घ्यावा लागणार आहे.

रम्यान, हा कर लावण्याचा विचार विनिमय सुरू असला तरी त्यामागे महसूल निर्माण करणे हा प्रमुख उद्देश नाही. तर देशातील बहुतांशी शहरांमधील नागरिकांकडून कचरा शुल्क वसूल केले जाते. मात्र मुंबई महापालिका असे कोणतेही शुल्क मुंबईकरांकडून घेत नाही. त्यामुळे स्वच्छ भारत अभियानामध्ये मुंबईला क्रमांक मिळत नाही. त्यामुळे कचरा संकलन कर लावण्याबाबत गेल्या अनेक वर्षांपासून चर्चा सुरू आहे. त्यादृष्टीने हा कर लावण्याबाबत विचारविनिमय सुरू असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

याबाबत सोमवारी पालिका आयुक्तांच्या दालनात सादरीकरण करण्यात आले. त्यावेळी आयुक्तांनी घनकचरा विभागातील नियम, दंड यांची माहिती घेतली. तसेच केंद्र सरकारच्या कायद्यानुसार असा कर लावलाच पाहिजे का, कायदा काय सांगतो, कायद्याच्या पलिकडे जाऊन कर न लावता काही नियम करता येतील का याबाबत आयुक्तांनी माहिती घेतली. मात्र याबाबत कोणताही निर्णय आयुक्तांनी अद्याप घेतलेला नाही.

# खाद्यपदार्थ घरपोच करणाऱ्या तरुणाला मारहाण करून लूटले

■ **मुंबई :** खाद्यपदार्थ घरोघरी पोहोचविणाऱ्या तरुणाला तिघांनी बेदम मारहाण करून त्याचा मोबाइल घेऊन पोबारा केल्याची घटना मंगळवारी रात्री चेंबूर परिसरात घडली. तरुणाने याबाबत केलेल्या तक्रारीच्या आधारे चुनाभट्टी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. खाद्यपदार्थ घरोघरी पोहोचविणाऱ्या कंपनीमध्ये अजितेश सिंग (२३) हा काम करतो. चेंबूर परिसरातील एका ग्राहकाला मंगळवारी रात्री खाद्यपदार्थ देण्यासाठी तो गेला होता. खाद्यपदार्थ घरी दिल्यानंतर तो चेंबूरच्या छगनमिठा या पेट्रोलपंपाजवळ उभा राहून फोनवर बोलत होता. याच वेळी तेथे आलेल्या तिघांनी त्याच्या हातातून मोबाइल हिसकावून घेतला. अजितेशने त्यांना विरोध केला असता तिघांनी त्याला बेदम मारहाण केली. तसेच चाकूचा धाक दाखवून तिघांनी तेथून पळ काढला. अजितेशने याप्रकरणी चुनाभट्टी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी तीन अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला. पोलीस याप्रकरणातील आरोपींचा शोध घेत आहेत.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**
**ता.जि.ठाणे, ४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८**
**शिक्षण विभाग**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र. मनपा/शि.वि./१२६०/2024-25** **दिनांक २४/१२/२०२४**

**// जाहीर सुचना //**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागा अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांकरिता वार्षिक ''सांस्कृतिक कार्यक्रमाचे'' आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमाचे आयोजन करणेसाठी खालीलप्रमाणे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति नग सर्व करासहित |
|---|---|---|
| 1 | फोटो व व्हिडिओ शुटिंग | |

तरी इच्छुक पुरवठादारांनी दि. 24/12/2024 ते दि. 02/01/2025 दुपारी 12.00 वाजेपर्यंत शिक्षण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नगरभवन, दुसरा माळा, भाईंदर (प.) या विभागात दरपत्रक प्रमाणपत्र, पॅनकार्ड सहित देण्यात यावे. कोणतेही कारण न देता दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे हा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

**जा. क्र. मनपा /मावज / ई - ३६०३६९२/२०२४**
**दि. २६/१२/२०२४**

**सही**
**(प्रसाद शिंगटे)**
**उप-आयुक्त (शिक्षण विभाग)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com